# वासुदेवशास्त्री खरे

मानसिंगराव कुमठेकर

तपस्वी इतिहासंशोधक, प्रतिभाशाली नाटककार आणि व्युत्पन्न कवी म्हणून मिरजेच्या वासुदेवशास्त्री खरे यांची साहित्य क्षेत्राला ओळख आहे. इतिहास, नाट्य आणि काव्य क्षेत्रात खरे शास्त्रींनी केलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. लो. टिळकांचे सहकारी असणाऱ्या आणि चिपळूणकरांनी पुण्यात सुरु केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलच्या पहिल्या पाच शिक्षकांमध्ये समावेश असलल्या वासुदेवशास्त्री खरे यांनी लोकमान्यांच्याच सांगण्यावरून १८८० साली मिरज हायस्कूलमध्ये संस्कृत शिक्षकाची नोकरी पत्करली. याचवेळी टिळकांनी पुण्यात सुरु केलेल्या वृत्तपत्राला 'केसरी' हे नांव आणि त्यावरील 'स्थिती नो रे दध्या' हा श्लोक सुचवून त्याचे 'गजालिश्रेष्ठा' हे मराठी भाषांत खरेशास्त्र्यांनी केले.

मिरजेत शिक्षक म्हणून काम करीत असताना त्यांना मिरजमळा संस्थानातील प्रचंड कागदपत्रांची माहिती मिळाली. मराठेशाहीच्या उत्तरार्धाची साधार कहाणी सांगणारी ही ऐतिहासिक कागदपत्रे पाहून खरेशास्त्र्यांनी मिरज हीच कर्मभूमी करण्याचे निश्चित केले. पटवर्धनी दप्तरात असणाऱ्या सुमारे १५ लाख कागदपत्रांचे संशोधन करून त्यांनी ऐतिहासिक लेख संग्रहाच्या १२ खंडाद्वारे पानिपत्तोत्तर मराठी राज्याचा साधार इतिहास जगापुढे मांडला.
अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कोणाचीही मदत नसताना स्वखर्चाने ही ग्रंथमाला त्यांनी छापली. देशातीलच नव्हे जगातील इतिहासकारही त्यांच्या या प्रचंड उद्योगाने स्तिमित होता.

या खंडाबरोबच नाना फडणविसाचे चरित्र, अधिकार, योग, हरिवंशाची बखर, इचलकरंजी संस्थानचा इतहास, मालोजी व शहाजी यांसारखे ऐतिहासिक ग्रंथ, ग्रँट डफच्या चुकांचे हप्ते, प्रो. लट्ठे आणि परशुरामभाऊची छत्री, चालू भाषेतील ऐतिहासिक शब्द, असे काही अभ्यासपूर्ण लेखही त्यांनी लिहीले. मराठे आणि इंग्रज या न. चि. केळकर यांच्या ग्रंथाला शास्त्रीबुवांनी लिहिलेला 'इतिहास डिंडिमाचा घोष' हा विख्यात उपोद्घात मराठी साहित्य शारदेच्या दरबारातील अमोल रत्नच आहे. हा उपोद्घात म्हणजे शास्त्रीबुवांच्या तेजस्वी प्रज्ञेचा व प्रतिभेचा दैदिप्यमान अविष्कारच आहे. सुमारे ४० वर्षे त्यांनी केलेल्या इतिहासमंथनाचे ते नवनीतच आहे. इतिहास संशोधनाबरोबरच खरेशास्त्र्यांनी प्रतिभाशाली नाटककार म्हणूनही ख्याती मिळविली होती. गुणोत्कर्ष, तारामंडळ, चित्रवंचना, कृष्णकांचन, शिवसंभव, उग्रमंगल, यांसारखी प्रसिद्ध नाटके त्यांनी लिहिली. शिवसंभव या नाटकाने तर मराठी रंभभूमीवर इतिहास निर्माण केला. या नाटकांनी डळमळू लागलेल्या तत्कालीन प्रसिद्ध नाटक मंडळांना आधार दिला.

व्युत्पन्न कवि म्हणूनही कै. वासुदेवशास्त्री खरे यांनी मोठी कामगिरी केली. त्यांच्या यशवंतराव महाकाव्याला तत्कालीन प्रसिद्ध अशा दक्षिणा प्राइज कमिटीचे बक्षिस मिळाले होते. 'पोटासाठी भटकत जरी मी दूरदेशी फिरेन' या त्यांच्या 'जन्मभूमी' कवितेतील ओळी त्यावेळी महाराष्ट्रभर प्रसिद्ध होत्या. गोपिकाबाईचा पुत्रशोक, उज्जयिनी यांसारख्या कवितांबरोबर अनेक स्फुट कविता त्यावेळच्या विविध नियतकालिकातून प्रसिद्ध झाल्या आहेत. काव्य, नाटक आणि इतिहाससंशोधन अशा विविध क्षेत्रात आपल्या प्रतिभेचा अविष्कार घडविणाऱ्या शास्त्रीबुवांना त्यावेळी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपदही मिळून गेले असते. मात्र प्रसिद्धी पराडमुख आणि 'एकला चला रे' या मार्गाने साहित्य शारदेची मनोभावे पूजा बांधणाऱ्या या सारस्वताला अशा लौकिक बाबींमध्ये अजिबात रस नव्हता. सन १८८० ते १८२४ अशी सलग ४४ वर्षे मिरजेत राहून मराठी साहित्यात भर घालणाऱ्या खरे यांचे योगदान फार मोलाचे आहे.